**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये सूचना.
बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ मध्ये सर्वे क्र.१४१ ए. न.भु.क्र.८३३(भाग) मौजे आंबीवली येथिल ३७०० चौ.मि. जमिनीसंबंधीच्या प्रस्तावित फेरबदलाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,**
**क्रमांक :- टिपीबी-४३२३/युओआर-५७/प्र.क्र.१४९/२०२३/नवि-११**
**दिनांक :- ०३ नोव्हेंबर, २०२३.**

**शासन निर्णय** : सोबतची सूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Patil

**( अमर पाटील )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत** :-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. मा.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति,

(१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
(२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(३) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.

२/- सदर सूचना शासनाच्या दिनांक १३.९.२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालीलप्रमाणे जाहिरात म्हणून प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव | नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२. |
| २) | जाहिरात कोणत्या दिनांकास द्यावयाची आहे | तात्काळ |
| ३) | प्रसिध्दीचे स्वरुप | स्थानिक |
| ४) | कोणत्या जिल्हयामध्ये | बृहन्मुंबई महागनरपालिका क्षेत्रामध्ये |
| ५) | किती वृत्तपत्रात | एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्रात |
| ६) | वृत्तपत्राचे नांव | सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात |
| ७) | किती वेळा | एकदा |
| ८) | जाहिरात खर्चाचे देयक कोणत्या अधिका-याकडे पाठवावयाचे त्या कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | आयुक्त, बृहनमुंबई महानगरपालिका. |

(५) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(६) निवड नस्ती (नवि-११)

Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

- Notice under section 37 (1AA) of the said Act.
- Proposed modification to Development Plan - 2034 for Greater Mumbai in respect of land admeasuring 3700 sq.mt.bearing Survey No 141 A, CTS 833(Part) Village Ambivali, Mumbai.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
Urban Development Department,
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated :- 3 November, 2023.

**NOTICE**

**No.TPB-4323/ UOR- 57/CR.149/2023/UD-11**

Whereas, in exercise of the powers conferred by sub Section (1) of Section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act"), the State Government vide Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as "the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") along with the Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification. And whereas, Government has issued a corrigendum of even number dt. 22nd June, 2018 to the said Notification, And whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in the Government Gazette dt. 30th June, 2018. The said Development Plan has came into force from 1/09/2018.;

And whereas, as per the said Development Plan, land admeasuring 3700 sq.mt. bearing Survey No 141 A, CTS No. 833(part) village Ambivali (Hereinafter referred to as "the said land") is reserved for "Municipal Maternity Home (RH1.3)";

And whereas, Govt. in Revenue Department vide Memorandum No. जमीन-2619/प्रक्र56/ज-3 dated 2/02/2022 has allotted said land to 'Shantabai Kerakar Memorial Trust' (Hereinafter refer to as the said Trust) on lease for period of 30 years subject to the conditions mention therein for the purpose of Maternity Home and Dispensary;

And whereas, Govt. in Revenue Department has received letter dated 20/09/2022 from Mr. Balvant kerakar Trustee, Shantabai Kerakar Memorial Trust wherein it is stated that, the trust has intention to provide medical services for common people in affordable manner. Also as there is no availability of general hospital in the surrounding area common people and needy people are deprived of medical services and if the potential of said land is fully utilized it will be possible to build a hospital of 250 to 300 beds and requested the Govt. in Revenue Department to increase the scope of the purpose of the said land from 'Maternity Home and Dispensary' to 'Maternity Home and Dispensary along with general hospital';

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32.
सत्यमेव जयते

And whereas, the Govt. in Revenue Department after obtaining the opinion from the Law and Judiciary Department and Public Health Department has requested to change the Reservation of 'Municipal Maternity Home (RH1.3)' to 'Hospital (RH1.2)' shown on the said land;

And whereas, considering the request of the said Trust, Revenue Department the Govt. is satisfied that in the public interest it is expedient to change the Reservation on the said land of 'Municipal Maternity Home (RH1.3)' to 'Hospital (RH1.2)' more specifically described in the schedule given below (hereinafter referred to as "the proposed modification");

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub-section (1AA) of Section 37 of the said Act; and of all other powers enabling it in this behalf, Government hereby publishes a Notice for inviting objections/ suggestions from any persons with respect to proposed modification, as required by clause (a) of sub-section (1AA) of Section 37 of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. The Government is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the proposed modification mentioned in the Schedule attached herewith may be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette, to the Deputy Director of Town Planning., Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001. Any objections or suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of sub-section (1AA) of Section 37 of the said Act by the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, who is hereby authorised under Section 162(1) of the said Act as an "officer" on the behalf of Government to hear objections / suggestions which are received and say of the said Corporation, as the case may be and submit his report to the Government;

A part plan showing the proposed modification is kept open for the inspection of the general public at the following offices :-

(1) Office of the Chief Engineer (Development Plan) Municipal Corporation of Greater Mumbai, Mahapalika Marg, Mumbai 400001.
(2) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400001.

## SCHEDULE

The Reservation shown on land admeasuring 3700 sq.mt of bearing Survey No 141 A, CTS 833(part) Village Ambivali is proposed to be changed from "Municipal Maternity Home (RH1.3 to "Hospital (RH1.2)".

This Notice is also available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in (Acts/Rules )

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Patil

**(Amar Patil)**
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) अन्वये सूचना.
- बृहन्मुंबई विकास योजना- २०३४ मध्ये सर्वे क्र. १४१ ए, न.भु.क्र. ८३३(भाग) मौजे आंबीवली येथिल ३७०० चौ.मि. जमिनीसंबंधीच्या प्रस्तावित फेरबदलाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,**
**दिनांक :- ३ नोव्हेंबर, २०२३**

**सूचना**

**क्रमांक :- टिपीबी-४३२३/युओआर-५७/प्र.क्र.१४९/२०२३/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने अधिसूचना क्र.टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि.८/०५/२०१८ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ (यापुढे याचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे. आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दि.२२ जून २०१८ रोजी निर्गमित केले असून. आणि ज्याअर्थी, त्यानंतर शासनाने उक्त अधिसूचनेस समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुध्दीपत्रक व पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. उक्त विकास योजना दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, सर्वे क्र. १४१ ए, न.भु.क्र. ८३३(भाग) मौजे आंबीवली येथील ३७०० चौमी क्षेत्रफ़ळ असलेले जमिन (यापुढे याचा उल्लेख "उक्त जमीन" असा करणेत आलेला आहे) ही 'म्यूनिसीपल मॅटर्नीटी होम (RH१.३)' या प्रयोजनासाठी आरक्षित दर्शविण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, शासन महसूल विभागाने ज्ञापन क्र जमिन-२६१९/प्र.क्र ५६/ज-३ दि २/०२/२०२२ रोजी उक्त जमिन 'शांताबाई केरकर मेमोरीयल ट्रस्ट' (यापुढे याचा उल्लेख "उक्त ट्रस्ट" असा करणेत आलेला आहे) ला सदर ज्ञापनामध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून मॅटर्नीटी होम व डीस्पेन्सरी या प्रयोजनार्थ ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने दिली आहे.

आणि ज्याअर्थी, शासन महसूल विभागास श्री. बलवंत केरकर, विश्वस्त, शांताबाई केरकर मेमोरीयल ट्रस्ट ने दि. २०/०९/२०२२ रोजीचे पत्र सादर केले आहे. सदर पत्रात, सर्वसामान्य जनतेला माफ़क दरात वैद्यकीय सोई-सूविधा पुरविण्याचा सदर ट्रस्ट चा मानस आहे. तसेच सभोवतालच्या परीसरात जनरल हॉस्पिटल ची सोय उपलब्ध नसल्याने सर्वसामान्य जनतेला वैद्यकीय सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. तसेच उक्त जमिनीचा पूर्ण वापर केल्यास २५० ते ३०० खाटांचे हॉस्पिटल बांधणे शक्य होईल नमूद करून सदर पत्राद्वारे उक्त जमिनीवरील मॅटर्निटी होम व डिस्पेन्सरी या प्रयोजनाच्या व्याप्तीमध्ये आणखी वाढ करुन मॅटर्निटी होम व डिस्पेन्सरी यासह जनरल हॉस्पिटल" या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यास अनुमती देणेबाबत शासन महसूल विभागास विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, शासन, महसूल विभागाने विधि व न्याय विभाग व सामान्य आरोग्य विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन उक्त जमिनीवरील 'म्यूनिसीपल मॅटर्नीटी होम (RH१.३)' हे आरक्षण बदलून 'हॉस्पिटल (RH१.२)' असे आरक्षण दर्शविण्याबाबत विनंती केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त ट्रस्ट व महसूल विभागाची विनंती विचारात घेता, उक्त जमिनीवर खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार 'म्यूनिसीपल मॅटर्नीटी होम (RH१.३)' ऐवजी 'हॉस्पिटल (RH१.२)' असे आरक्षण दर्शविण्याबाबत सार्वजनिक हिताचे दृष्टीने आवश्यक आहे, अशी शासनाची खात्री झाली आहे. (यापुढे याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करणेत आलेला आहे);

आता त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील प्राप्त इतर सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड(क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून सदरची सूचना शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याचे मुदतीमध्ये हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे;

शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती /सूचना शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील ठिकाणी ठेवण्यात आला आहे. :-

(१) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई-४००००१.

(२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई-४००००१.

## परिशिष्ट

The Reservation shown on land admeasuring 3700 sq.mt of bearing Survey No 141 A, CTS 833(part) Village Ambivali is proposed to be changed from "Municipal Maternity Home (RH1.3 to "Hospital (RH1.2)".

सदर सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/ नियम) या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. सत्यमेव जयते

Patil

(अमर पाटील)

**अवर सचिव महाराष्ट्र शासन**